**सुविचार**
खोटा मान सोडा म्हणजे तुम्हाला काहीही कमी पडणार नाही.



महालक्ष्मी लॉन्स, कर्वेनगर, पुणे : 'सकाळ खाऊ गल्ली सीझन ५'मध्ये खास ख्रिसमसनिमित्त 'डब्ल्यू एस बेकर्स'ने सहा फुटी केक ठेवला होता. खाद्यजत्रेत हा केक आकर्षण ठरला.

## जेजुरीच्या प्रमुख विश्वस्तपदी लोढा

पुणे, ता. २६ : लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या जेजुरी खंडोबा येथील मार्तंडदेव संस्थानच्या प्रमुख विश्वस्तपदी राजकुमार लोढा यांची निवड करण्यात आली आहे. नवनियुक्त विश्वस्त मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला.

पुणे विभागाचे सहधर्मादाय आयुक्त शिवाजी कचरे यांनी १५ डिसेंबर रोजी राजकुमार लोढा, ॲड. प्रसाद शिंदे, ॲड. अशोकराव संकपाळ, तुषार सहाणे, जेजुरीचे संदीप जगताप, शिवराज झगडे आणि पंकज निकुडे पाटील यांची पाच वर्षांच्या कार्यकालासाठी नियुक्ती केली आहे.

रविवारी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत राजकुमार लोढा यांची प्रमुख विश्वस्तपदी निवड झाली. प्रत्येक नवनिर्वाचित विश्वस्ताला या पदावर संधी मिळावी, यासाठी लोढा यांची नऊ महिन्यांकरिता निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# फुले दांपत्य सन्मान दिनानिमित्त पुण्यामध्ये एक जानेवारीला रॅली

**पुणे, ता. २६ :** 'क्रांतिसूर्य जोतिराव फुले फोरम ऑफ सोशियो' आणि 'कमर्शिअल ॲण्ड इंडस्ट्रीअल ॲक्टिव्हिटी' या संस्थांतर्फे 'फुले दांपत्य सन्मान दिना'निमित्त १ जानेवारीला रॅली आयोजित केली आहे.

बुधवार पेठेतील भिडे वाड्यापासून सकाळी दहा वाजता रॅलीला सुरवात होणार असून, विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न मिळावा, महात्मा फुले यांचे समग्र साहित्य पुनर्प्रकाशित करावे, आदी मागण्यांसाठी ही रॅली काढण्यात येत आहे. तिचा समारोप गंज पेठेतील फुले वाड्यावर होईल, अशी माहिती माजी आमदार कमल ढोले-पाटील आणि संयोजक अविनाश ठाकरे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

# एल्गार परिषद प्रसंगी रस्त्यावर

## कबीर कला मंचच्या ज्योती जगताप यांचा इशारा

**पुणे, ता. २६ :** ''कोरेगाव भीमाच्या जातीअंताच्या लढ्याला दोनशे वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने आयोजित केलेल्या 'भीमा कोरेगाव शौर्यदिन प्रेरणा अभियानां'तर्गत घेण्यात येणाऱ्या 'एल्गार परिषदे'ला काही संघटनांचा विरोध आहे. असे असले तरी आम्ही ही परिषद घेणारच. वेळप्रसंगी शनिवारवाड्यावर होणाऱ्या या परिषदेला परवानगी मिळाली नाही तरी विरोध झुगारून रस्त्यावर परिषद घेऊ,'' असे कबीर कला मंचच्या ज्योती जगताप यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

ही परिषद 'पेशवाई'च्या विरोधात असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. 'संविधान वाचवा, लोकशाही वाचवा आणि देश वाचवा' हा संदेश समाजापर्यंत पोचविण्यासाठी ही परिषद होत असल्याचे जगताप यांनी नमूद केले.

**“ ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'चे सचिव मौलाना अब्दुल हमीद अजहरी हेही परिषदेत आपले मत मांडणार आहेत. ते त्यांची भूमिका मांडणार असल्याने यात काही गैर नाही. या परिषदेला विरोध असला तरी, आम्ही संविधानाचे महत्त्व त्यातून पोचवणार आहोत.**
**- ज्योती जगताप**

राज्यातील १६ जिल्ह्यांतील सुमारे २०० संघटनांनी एकत्र येऊन ही परिषद आयोजित केली आहे. यासंदर्भात प्रेरणा मार्च काढण्यात येत आहे. त्याची सुरवात २३ डिसेंबरला नाशिकमधील येवला येथून झाली आहे. हा मार्च ३१ डिसेंबरला पुण्यात येणार आहे. त्यासाठीच शनिवारवाड्यावर ही परिषद होणार आहे. परिषदेचे उद्‌घाटन रोहित वेमुर्ला यांच्या आई राधिका वेमुर्ला यांच्या हस्ते होईल. माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत हे या वेळी उपस्थित राहतील. या परिषदेत गुजरातमधील नवनिर्वाचित आमदार जिग्नेश मेवानी यांच्यासह उमर खालिद, विनय रतनसिंग आणि प्रशांत दोंथा हे सहभागी होणार आहेत. भारिप बहुजन महासंघाचे नेते प्रकाश आंबेडकर, माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील, 'सर्वहारा जनआंदोलना'च्या उल्का महाजन, आदिवासी महिला नेत्या सोनी सोरी हे विचार मांडणार आहेत. ही परिषद दुपारी दोन ते रात्री आठ या वेळेत होणार आहे.

**व्हॉट्सॲप न्यूज ७७२१९७४४४७**



### चिंचवडच्या आठवडे बाजारात अतिक्रमण

चिंचवडगाव येथील केशवनगर भागात आठवडे बाजारात फळविक्रेते, हातगाडी यांचे अतिक्रमण तसेच काळेवाडी रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे सुरू असलेले काम. या मुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे, असे **अक्षय कोकरे** यांनी म्हटले आहे.



### पादचारी मार्गावरील झाडे-झुडपे हटवा

चिंचवडगाव ते पिंपरी स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावर (लिंक रोड) हेरिटेज प्लाझापासून विशाल कॉर्नर अपार्टमेंट समोरील पदपथावर झाडे-झुडपे वाढल्यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन चालावे लागते. त्यामुळे झाडा-झुडपांची छाटणी करण्याची मागणी **सां. रा. वाठारकर** यांनी केली.

# ओडिसी नृत्य हे शिल्पाकृतीसारखे

## मुद्‌गल यांचे मत; 'गांधर्व'च्या संगीत समारोहाचा समारोप

**पुणे, ता. २६ :** ओडिसी हा नृत्यप्रकार शिल्पशास्त्रावर आधारित आहे. त्यामुळे आपली प्रत्येक हालचाल आपल्याला आणि समोरच्यालाही एखाद्या शिल्पाकृतीसमान वाटली पाहिजे. इतके आपण नृत्याशी एकरूप व्हायला हवे. त्यासाठी मंचावरील भवतालाचा वापर आपण कसा करतो, हे खूप महत्त्वाचे असते, अशा शब्दांत भवतालाचे महत्त्व ज्येष्ठ ओडिसी नृत्यांगना माधवी मुद्‌गल नवोदित कलावंतांना सांगत होत्या. नृत्य करणे सोपे नाही. त्यामुळे ते 'व्हल्गर' वाटणार नाही, याचीही काळजी कलावंतानेच घ्यावी लागते, असेही त्या म्हणाल्या.

गांधर्व महाविद्यालयाच्या 'वि. वि. द. स्मृती संगीत समारोहा'च्या सांगता सोहळ्यात मुद्‌गल सहभागी झाल्या होत्या. ओडिसी नृत्याचे तंत्र, सोलो आणि ग्रुप ओडिसीतील बारकावे, नृत्य करताना भवतालाचा खुबीने केला जाणारा वापर, ओडिसी नृत्य आणखी फुलावे यासाठी करावी लागणारी साधना... अशा विविध विषयांवर त्या व्यक्त होत होत्या. कधी शब्दांतून तर कधी नृत्यातून. त्यामुळे मैफल फुलत गेली. या वेळी केतकी शेणोलीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

मुद्‌गल म्हणाल्या, ''ज्या साहित्यातील रचना निवडाल त्या साहित्याचा, रचनेचा पूर्ण अभ्यास तुम्ही केला पाहिजे. त्यामुळे भाव व्यक्त करताना सोपे जाते. नवी पिढी हुशार आहे. ती पटकन ग्रहण करते; पण त्यांनी रियाजाची सवय लावून घ्यायला हवी. सुरवातीची किमान तीन-चार वर्षे त्यासाठी द्यावी लागतात. प्राथमिक गोष्टी शिकल्यानंतर तुम्हाला यात थोडी समज येते. नृत्याबरोबरच कलावंताला गाण्याची आणि तालाचीही समज हवी. असे असेल तर ते नृत्य नक्कीच प्रभावी ठरते. त्यासाठी समर्पित वृत्तीने नृत्य शिकावे लागते. गुरूवर श्रद्धा ठेवावी लागते.''




# सम्यक साहित्य संमेलन अकरा जानेवारीपासून

**पुणे, ता. २६ :** ''विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व स्टडीज सेंटर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ११ ते १४ जानेवारीदरम्यान 'अखिल भारतीय सम्यक साहित्य संमेलन' आयोजित केले आहे. अध्यक्षपदी साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर आहेत. सूर्यनारायण रणसुभे यांना जीवनगौरव पुरस्कार दिला जाणार आहे,'' अशी माहिती संयोजक परशुराम वाडेकर यांनी मंगळवारी दिली.

उद्‌घाटन १२ जानेवारी रोजी के. इमोक यांच्या हस्ते सकाळी अकरा वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे होईल. ११ जानेवारीला शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (एसएसपीएम शाळा) येथून संविधान सन्मान रॅलीद्वारे संमेलनाला सुरवात होईल. १२ जानेवारीला संमेलनात ग्रंथप्रदर्शनाच्या उद्‌घाटनाबरोबरच 'मी आणि माझे साहित्य', 'राजकीय पक्ष आणि दलित राजकारण' या विषयांवरील परिसंवादासह कवी संमेलन आणि 'द ग्रेट रिपब्लिकन कार्यकर्ता' हे नाटक होणार आहे. १३ जानेवारीला सप्तखंजिरी प्रबोधन कार्यक्रमासह ज्येष्ठ लेखक उत्तम कांबळे आणि नजुबाई गावित यांच्या मुलाखती होतील. 'भीमा कोरेगाव संघर्षगाथा, साहित्यिक व इतिहासकारांची भूमिका', 'दलित चळवळीची सद्यस्थिती आणि लेखकांची भूमिका' या विषयांवर परिसंवाद होईल. कवी संमेलनासह 'समाजस्वास्थ' हे नाटक होईल. १४ जानेवारीला 'तुफानातील दिवे' या कार्यक्रमासह 'सांस्कृतिक दहशतवादाची आव्हाने आणि प्रतिकाराची पर्यायी संरचना', 'नामांतराचा लढा आणि मराठी साहित्य' हे परिसंवाद आयोजित केले आहेत. हे संमेलन बालगंधर्व रंगमंदिर येथे सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळेत होईल.

## 'स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी टक्का वाढतोय'

लोणावळा, ता. २६ : स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी टक्का वाढतोय, मात्र त्याचे प्रमाण नगण्य आहे. तो वाढविण्यासाठी तरुणांनी प्रयत्नपूर्वक यश मिळविणे आवश्यक आहे, असे मत मध्य रेल्वेचे परिवहन निरीक्षक किरण होजगे यांनी व्यक्त केले.

कुसगाव बुद्रुक येथे भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती पतसंस्था व शिवसेवा प्रतिष्ठानतर्फे 'मराठी तरुण आणि सरकारी नोकरी' या विषयावर आयोजित व्याख्यानात होजगे बोलत होते. पतसंस्थेचे अध्यक्ष सुधीर कुलकर्णी, शिवसेवा प्रतिष्ठानचे धनंजय चंद्रात्रे, मुरलीधर लोहोर, सुनील उदावंत, पांडुरंग मीनियार, राजू फाटक, वाघू दळवी, रामभाऊ कालेकर, शुभांगी केळगणे, सुरेखा फाटक, जयश्री हरिश्चंद्रे, मनोज वाणी, बाबूलाल वर्मा आदी उपस्थित होते.

होजगे म्हणाले, ''विद्यार्थी दशेतच ध्येय, लक्ष्य निश्चित करून वाटचाल करावी.'' स्वतःची प्रगती, कौटुंबिक हित व देशसेवेचे समाधान मनात ठेवण्याचे आवाहन चंद्रात्रे यांनी केले.

